# वसई- विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती "आय" वसई

उमेळा मार्केट

बाजार विभाग

**प्रथम फेर दर दरपत्रक**

सन २०२०-२१-२२-२३-२४

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" वसई (प.) अंतर्गत येणाऱ्या उमेळा बाजार कर वसुली करणे कामी दरपत्रक मागविण्याबाबत.

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती “आय” वसई

## प्रथम फेर दरपत्रक

कामाचे नाव :- दि.1 /4 /2021 ते दि.31/03/2024 या कालावधीकरीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती “आय” वसई (प.) अंतर्गत उमेळा मार्केट फी वसुली करिता ठेका पध्दतीने देणेबाबत.

दरपत्रक/पुरवठा धारकाचे पुर्ण नाव :-----------------------------------------------------

संपुर्ण पत्ता (पिन कोडसह) :-----------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक :- कार्यालय :- -----------------------------------------------

:- मोबाईल :-----------------------------------------------

**(परिशिष्ठ – अ)**

| कामाचे नाव | किमान देकार रक्कम रुपये | अभिकर्ताने नमुद करावयाचे रक्कम |
|---|---|---|
| सन-2021-22-23-24<br>(दि.01/04/2021 ते दि.31/03/2024) या 3 वर्षकालावधी करिता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती “आय” (वसई) अंतर्गत येणाऱ्या **उमेळा मार्केट** येथील फी वसुली ठेका पध्दतीने देणे बाबत. | **2021-22 :- 81,921/-**<br><br>**2022-23 :- 90,113/-**<br><br>**2023-24 :- 99,124/-**<br><br>**अपेक्षित रक्कम रु.**<br><br>**एकुण – 2,71,158/-** | **रक्कम रु. (अंकात** -----------<br>------------------------------<br>------------------------------<br>------------------------------<br>**रक्कम रु. (अक्षरी** -----------<br>------------------------------<br>------------------------------<br>------------------------------<br>------------------------------ |

पॅनकार्ड, आधारकार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र साक्षांकित केलेली प्रत जोडणे बंधनकारक आहे.

दरपत्रक भरणाऱ्या ठेकेदाराची

तारखेसहीत सही व शिक्का

(signature) 23/04/21.

# अटी व शर्ती

१) विहीत नमुन्यात भरलेली दरपत्रके आधारकार्ड, पॅनकार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र सिलबंद लखोटयामध्ये दि.३०/०४/२०२१ रोजी दु.३ .०० वाजेपर्यंत प्रभाग समिती- आय येथे सिलबंद पेटीत टाकावी. मुदती नंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.

२) सदरील दरपत्रके दि.२६/४/२०२१ ते दि.३०/४/२०२१ दु.३ .०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

२) किमान देयक रक्कम

१. ठेकेदाराने दरपत्रके भरताना लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा लिफाफ्यात रक्कम/ दर नमुद करावेत.

२. जास्त दराचा दरपत्रक स्विकारल्यानंतर एकुण देयक रक्कम ४ टप्यात महानगरपालिका फंडात जमा करावयाचे असून त्याचा तपशील खालील प्रमाणे.

- एकुण देयक रक्कमेच्या २५% रक्कम दरपत्रक स्विकारल्याच्या दिनांकापासून १० दिवसात महानगरपालिका फंडात धनाकर्षाद्वारे/ आर.टी.जी.एस/ एन.इ.एफ.टी.द्वारे जमा करावयाची आहे.
- तद्नंतर २५% रक्कम माहे ऑक्टोबंर २०२१ मध्ये जमा कराचयाची आहे.
- तसेच २५% रक्कम माहे जुन २०२२ मध्ये जमा करावयाची आहे.
- उर्वरीत २५% रक्कम माहे मार्च २०२३ मध्ये मनपा फंडात जमा करावयाची आहे.

१) प्रभाग समिती हद्दीत नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणामुळे बाजार बंद झाल्यास महानगरपालिकेकडून नुकसान भपाई मागता येणार नाही.

२) ना फेरीवाले क्षेत्रामध्ये बसणाऱ्या फेरवाल्यांना अतिक्रमण विभागाकडून उठविण्यात येईल. अभिकर्त्यास त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

३) बाजार फी वसुली महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानूसार करावयाचे आहे. (दराची माहीती संबधित प्रभागांच्या सहा. आयुक्त यांचे कार्यालयात उपलब्ध असेल.) निश्चित करुन दिलेल्या पेक्षा जादा दराने वसूली केल्यास अगर तशा आशयाची तक्रार आल्यास ठेका रद्द करण्यात येईल, व आपली किमान देकार रक्कम जप्त करण्यात येईल. यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस अभिकर्ता जबाबदार राहील.

४) दैनंदिन बाजार वसुलीसाठी लागणारी पावती पुस्तके ठेकेदारास स्वखर्चाने छपाई करुन पावती पुस्तके महानगरपालिका बाजार विभागामार्फत प्रमाणित करुन घ्यावी लागेल व त्याचा वापर करावा लागेल.

५) ज्या ठेकेदारास दरपत्रक मंजुर होईल अशा मंजुर दरपत्रक धारकाने जाहीर दरपत्रक सुचनेत नमुद केले प्रमाणे पुर्ण रक्कम डिमांड ड्राफ्टने जमा करुन करारनाम्यासाठी आवश्यक रक्कमेचे स्टॅम्प पेपर कार्यालयात जमा करुन करारनामा करुन घ्यावा.

६) बाजार शुल्क वसुली करताना नागरीकांशी, व्यापरांशी सौजन्याने वागावे कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) दरपत्रक अटी शर्ती प्रमाणे व मंजुर दराप्रमाणे काम करण्यास नकार दिला व कामात काही वाद विवाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त यांचा निर्णय अंतीम राहील, वत्याचे अनुपालन करण्याचे ठैकदारावर बंधनकारक राहील. यर विरुध्द दाद मागता येणार नाही.

[signature] २३/०४/२१

८) वसुलीच्या कामाच्या तपासणीचे अधिकार महानगरपालिकेचे आयुक्त, उप.आयुक्त, सहा.आयुक्त ह्यांना राहील.

९) अभिकर्त्यास वसुलीकामी नेमणुक केलेल्या व्यक्तीच्या नावाची यादी महानगरपालिकेस देणेबंधनकारक आहे. व वसुली करण्याचे ओळखपत्र सहा. आयुक्त यांचे कडून प्रमाणित करुन आवश्यक आहे.

१०) दरपत्रक धारकांना त्या वर्षाच्या कालावधीत ठेक्याची वसुली करावी लागेल. सदरचा ठेका परस्पर दुसऱ्यास हस्तांतर करता येणार नाही. तसे केल्यास अगर निदर्शनास आल्यास ठेका तात्काळ रद्द करण्यात येईल.

११) महानगरपालिकेच्या अटी- शर्ती आपणांवर बंधनकारक राहतील व इतर कायद्यातील तरतुदी आपणांवर बंधनकारक राहतील.

१२) सदरील कामाकरिता महानगरपालिका आपणांस कोणतेही मनुष्यबळ, यंत्र, अवजारे वाहा देणार नाहीत. आवश्यकतेनुसार स्वत:चे साहीत्य व मुनष्यबळ वापरुन सेवा पुर्णपणे उपलब्ध करावयाची आहे.

१३) दरपत्रकेच्या वैध कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या संमती शिवाय दरपत्रक धारकास त्याची दरपत्रक रद्दकरता येणार नाही. तथापी तशी परिस्थिती उद्भवल्यास पुर्वग्रह दुषित शिवाय महानगरपालिका ठेकेदाराची किमान देकार रक्क्म जप्त करेल व ठेकेदारास दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

१४) मंजुर देकार रक्कमेवर २% आयकर भरावा लागेल तसेच शासनाचे विविध कर भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१५) कोणत्याही ठिकाणी नविन फेरीवाले बसविण्यास प्रोत्साहित करता येणार नाही. तसे केल्यास अगर निदर्शनास आल्यास ठेका तात्काळ रद्दकरण्यात येईल.

१६) कुठलाही देकार स्विकारण्याचा/ नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचा राहील.

१७) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

१८) वरील सर्व अटी व शर्तीत बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना असतील.

अ) पॅनकार्ड

ब) आधारकार्ड

क) जी.एस.टी. प्रमाणपत्र

ड) दर अंकात व अक्षरात रुपयामध्ये नमुद करावेत.

१९) वरील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे आपणांस बंधनकारक असेल अन्यथा ठैका रद्द करण्यात येईल.

उप-आयुक्त (दै.बाजार फी)
वसई- विरार शहर महानगरपालिका